28 FEB 2017

जनसंपर्क कक्ष

तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकरांनी दलित पत्रकारितेला कार्यक्रम दिला

## डॉ. राम मोहन पाठक यांचे प्रतिपादन : वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाची राष्ट्रीय परिषद

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषिक पत्रकारितेचे महत्त्व जाणून होते. बंगाली व मराठी पत्रकारितेचे हिंदी पत्रकारितेमध्ये सामाजिक प्रेरणा निर्माण करण्यात त्यांचे महत्वाचे योगदान आहे. समाजातल्या अशिक्षित, दलित, शोषित जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक मराठी पत्रकारिता केली. त्यांच्या या पत्रकारितेनेच देशातील दलित पत्रकारितेला कृती कार्यक्रम देण्याचे काम केले, असे प्रतिपादन काशी बनारस विश्वविद्यालयातील माजी वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. राम मोहन पाठक यांनी केले.

आयसीएसएसआर पुरस्कृत शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय दृष्टीकोन आणि त्याचे वर्तमानकालीन प्रयोजन' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कोलकता विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या डॉ. तापती बसू होत्या.

डॉ. पाठक म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या वृत्तपत्रांना जागा व भरगोस अर्थिक मदत केली. त्यामुळे कोल्हापूर हे हिंदी व दलित पत्रकारितेचे उगमस्थान आहे. राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या शिष्यवृत्तीवर परदेशात जाऊन शिक्षण घेऊन, शाहूंच्या विचाराचा वारसा जपणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काढलेले 'बहिष्कृत भारत' हा भारतामधील बहिष्कृत जनतेच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा होता.

डॉ. तापती बसू अध्यक्षस्थानावरून म्हणाल्या, देशात राजकीय स्वातंत्र्याची चळवळ जोमात असताना सामाजिक स्वातंत्र्याच्या संघर्षाला धार प्राप्त करून देण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. भारतीय समाजावर त्यांचे हे थोर उपकार आहेत.

यावेळी आग्रा येथील डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे प्रमुख डॉ. गिरीजा शंकर, म्हैसूर विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या विभागाचे प्रमुख डॉ. बी. पी. महेशचंद्र गुरू, औरंगाबाद विद्यापीठाचे डॉ. सुरेश पुरी, खुल्ताबाद येथील चिस्तीया महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख डॉ. गणी पटेल, डॉ. ओंकार काकडे, दशरथ पारेकर, डॉ. वासंती रासम, डॉ. ज.रा. दाभोळे, डॉ. प्रताप पाटील, मयूरा जाधव, डॉ. वासंती रासम आदी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

# यूथ एक्स्चेंज प्रोग्रॅमची ब्रँड अॅम्बेसिडर

Maruti.Patil
@timesgroup.com
Tweet : @MarutipatilMT

**प्रजासत्ताक दिनाच्या संचलनानंतर झालेल्या यूथ एक्स्चेंज प्रोग्रॅमसाठी घेतलेल्या परीक्षेनंतर आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळेच इंडियन आर्मीमध्ये ऑफिसर होण्यासाठी एसएसबी परीक्षेची तयारी सुरू केली आहे. आर्मीमध्ये भरती होऊन वडिलांचा वारसा पुढे चालवायचा आहे.**
**- अक्षया पिंपळे**



**अक्षया पिंपळे ठरली विद्यापीठाची रणरागिणी**

**कोल्हापूर :** देशप्रेमाची मनात रुजलेली भावना, वडिलांकडून मिळालेली सैनिकी शिस्त, संरक्षण क्षेत्राविषयीची आवड यातून नॅशनल कॅडेट कोर्सच्या (एनसीसी) माध्यमातून विवेकानंद कॉलेजची विद्यार्थिनी, उचगाव येथील अक्षया विजयकुमार पिंपळे यांनी भूतान येथील यूथ एक्स्चेंज प्रोग्रॅममध्ये देशाची अॅम्बेसिडर म्हणून बहुमान मिळवला आहे. एनसीसीमध्ये केलेल्या दैदिप्यमान कामगिरीमुळे अक्षयाचा नुकत्याच झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षान्त समारंभात ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते रणरागिणी ताराराणी पुरस्काराने गौरव करण्यात आला.

अक्षयाचे वडील विजयकुमार पिंगळे हे सेवानिवृत्त हवालदार. पहिल्यापासून सैन्यदलाचे आकर्षण असलेल्या अक्षयाला त्यांच्याकडून मार्गदर्शन लाभले. न्यू मॉडेल इंग्लिश स्कूलमध्ये असताना ती एनसीसीमध्ये दाखल झाली. शालेय स्तरावर विविध पारितोषके पटकावल्यानंतर बी. एसस्सीचे शिक्षण घेताना तिने एनसीसीमध्ये वेगळा ठसा उमटवण्यास सुरुवात केली. धावणे, लांब उडी या क्रीडा प्रकारांबरोबरच ड्रॉइंगची आवड तिने जपली. रक्तदान, वृक्षारोपण, पल्स पोलिओ, एड्स जनजागरण रॅली, लेक वाचवा अभियान यांसारख्या सामाजिक उपक्रमात तिने वेगळी कामगिरी केली. कोल्हापूर जिल्ह्यातून बेस्ट कॅडेट म्हणून तिची निवड झाली.

बेस्ट कॅडेट बहुमानामुळे तिची प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड झाली. राज्यातील १४७ एनसीसी कॅडेट्सचा औरंगाबाद येथे कॅम्प झाला. या कॅम्पमध्ये अक्षयाने दुसरा क्रमांक मिळवून संचलनासाठीची निवड सार्थ ठरवली. संचलनासाठी पंधरा दिवस दररोज रात्री दोन ते सकाळी दहा वाजेपर्यंत आर्मीतील अधिकाऱ्यांच्या समवेत ट्रेनिंग सुरू होते. त्याचवेळी भूतान येथे होणाऱ्या यूथ एक्स्चेंज प्रोग्रॅमसाठीची लीडरशीप, ड्रील, गटचर्चा, फायरिंग, ब्रीफ फायरिंग, फ्लॅग एरिया, लेखी परीक्षा आणि मुलाखत यामाध्यमातून तिची देशाची अॅम्बेसिडर म्हणून निवड झाली. देशातील ८५० कॅडेट्समधून केवळ दहा जणांची यासाठी निवड झाली.

देशाच्या संस्कृतिचे सादरीकरण करून दहाजणांच्या चमुने भूतानचे शिक्षणमंत्री, आर्मीचीफ, आयएमआरटी यांच्याबरोबर चर्चा करुन भूतान येथील संस्कृती, खेळाबाबतची माहिती घेतली. पुणे येथील थलसेना कॅम्पमध्ये सहभागी झालेली ती कोल्हापूर येथील एकमेव कॅडेट होती. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अक्षयाने केलेल्या उज्ज्वल कामगिरीची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या दीक्षान्त समारंभात तिला रणरागिणी ताराराणी पुस्काराने डॉ. काकोडकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. शालेय स्तरापासून एनसीसीमध्ये मिळालेल्या पारितोषकांच्या जोरावर सैन्यदलात अधिकारीपदावर विराजमान होण्याचे स्वप्न अक्षयाने बाळगले आहे. अक्षयाला एनसीसीमधील करिअरमध्ये लेप्टनंट सुनीता भोसले-दळवी, ब्रिगेडिअर पी. के. गंजू, कर्नल साजी अब्राहम, प्राचार्य डॉ. हिंदूराव पाटील, सहा महाराष्ट्र एनसीसी गर्ल्स बटालियन आणि पीआय स्टाफचे मार्गदर्शन मिळाले.

## राष्ट्रपती, पंतप्रधानांसोबत चहापान

प्रजासत्ताकदिनाला अक्षयाची निवड झाल्यानंतर डिसेंबरमध्ये ट्रेनिंगसाठी दिल्लीला रवाना झाली. निवड झालेली सर्वच कॅडेट आर्मीच्या कडक शिस्तीमध्ये राजपथावर संचलनाचा सराव करत होते. मध्यरात्री दोन वाजता सर्व कॅडेट्सना एकत्र बोलवल्यानंतर त्यांची कसून तपासणी केली जात होती. दोन तासांमध्ये बोचऱ्या थंडीत तपासणी झाल्यानंतर संचलन सुरू होत होते. थंडीतही घाम फोडणाऱ्या संचलनावेळी आर्मीतील वरिष्ठ पदावरील अनेक अधिकारी उपस्थित राहत होते. त्यावेळी अनेकांना त्यांच्याशी संवाद करण्याची संधी मिळत होती. त्यावेळी देशसेवेबाबत अनेक बारकावे आत्मसात करण्याची संधी या कॅडेट्सना उपलब्ध झाली. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनानंतर राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, पंतप्रधान नरेंद्र मोदी व फ्रान्सच्या अध्यक्षांसोबत चहापानाची संधी सर्वच कॅडेट्सना मिळाली.



एनसीसीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणारी विवेकानंद कॉलेजची विद्यार्थीअक्षया पिंपळे हि रणरागिणी ताराराणी पुरस्कारने शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात गौरव करताना डॉ. अनिल काकोडकर. व्यासपीठावर डावीकडून परीक्षा नियंत्रक महेश काकडे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 FEB 2017
सकाळ

# शिक्षणामुळे देशाची अनेक क्षेत्रांत झेप : डॉ. शिंदे

## चिखली येथील नाईक कॉलेजमध्ये व्याख्यान

सरूड, ता. २७ : "भारताला शिक्षणाची मोठी परंपरा अगदी प्राचीन काळापासून आहे आणि आज देशाने शिक्षणाच्या जोरावरच जगातल्या अनेक क्षेत्रांत झेप घेऊन आपला ठसा उमटवला आहे", असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

चिखली (ता. शिराळा) येथील आनंदराव नाईक कॉलेजमध्ये महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्ञानविस्तार व्याख्यानमालेत 'उच्च शिक्षण आणि आजचा विद्यार्थी' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील होते.

डॉ. शिंदे म्हणाले, "कधी काळी देश दुष्काळामुळे होरपळत होता; परंतु या क्षेत्रात झालेल्या आधुनिक संशोधनामुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. १०४ उपग्रह घेऊन व वाहून नेण्याची क्षमता याच देशाने साधली आहे. हे सर्व शिक्षणामुळे साध्य झाले. खरे तर आजचा विद्यार्थी अवांतर वाचनापासून दूर जात आहे. काय शिकतो यापेक्षा कसं शिकतो, हे महत्त्वाचे आहे. जे निर्माण केलंय ते मनुष्यानंच म्हणून अवघड आणि डोक्यावरून जाणारं असं काहीच नसतं."

प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील म्हणाले, "कोणतंही यश डोक्यात जाता कामा नये. शाळा, महाविद्यालयांभोवती असणाऱ्या स्टँडवरची गर्दी ग्रंथालयात वाचनासाठी व्हायला हवी. स्पर्धेच्या युगात टिकायचे झाल्यास आधुनिक ज्ञान आवश्यक आहे."

स्वागत व प्रास्ताविक डॉ. प्रकाश दुकळे यांनी केले. डॉ. मीना जोखे यांनी सूत्रसंचालन, तर प्रा. शहाजी मस्तूद यांनी आभार मानले.




**चिखली (ता. शिराळा) : येथील नाईक कॉलेजमध्ये बोलताना डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, डॉ. प्रकाश दुकळे.**
**(डी. आर. पाटील, सरूड)**

28 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवमहोत्सवात उमटले स्वरझंकार

कोल्हापूर टाइम्स टीम

अर्जुन टाकळकर





शिवाजी विद्यापीठात आयोजित शिवमहोत्सवाला रसिकांचा जोरदार प्रतिसाद मिळाला. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही एन. शिंदे यांचा शिववनश्री पुरस्कार देऊन सन्मान करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड.

शिवाजी विद्यापीठाच्या आजी-माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या शिवमहोत्सवात रविवारी हिंदी-मराठी गीतांच्या स्वरांचा झंकार उमटला. गायक प्रेसनजीत कोसंबी आणि संगीता कुलकर्णींच्या गाण्यांनी तरुणाई नृत्यात दंग होऊन गेली. सोबतीला सार्थक क्रिएशनच्या कलाकारांनी सादर केलेल्या नृत्याविष्काराला टाळ्या आणि शिट्ट्यांची जोरदार दाद मिळाली. हिंदी-मराठी गीतांच्या या सदाबहार कार्यक्रमाबरोबरच शिववनश्री व शिवपुरस्कारांने विविध मान्यवरांचा प्रमुख पाहुणे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते गौरव करण्यात आला.

वैदेही जाधव व वेदा सोनुले यांच्या व्यंकटेश स्त्रोताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. अत्यंत मंजूळ सुरांत गायिकांनी सादर केलेल्या स्त्रोतपठणाने लोककला केंद्रात आल्हाददायक वातावरण निर्माण बनले. त्यानंतर मात्र प्रेसनजीत कोसंबी व संगीता कुलकर्णी यांनी सादर केलेल्या गीतांनी उधाण आले.

**शिवमहोत्सवात डॉ. शिंदेंना 'शिववनश्री'**

प्रसेनजीतच्या जादुई सादरीकरणानंतर सार्थक क्रिएशनने सादर केलेल्या 'गोविंदा' डान्सने तर युवकांनी हे केंद्र डोक्यावर घेतले. एस. एम. लोहिया हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला कलानृत्याची जादू येथेही पाहायला मिळाली. लय आणि ताल यांचा सुरेख संगम साधत कलाकारांनी श्रोत्यांची मने जिंकली. श्वास अकादमीच्या कलाकारांनी २६/११ मध्ये बळी पडलेल्या शहिदांना मानवंदना देऊन देशप्रेम जागृत केले. संगीता कुलकर्णीने 'गुलाबी हवा' गाणे सादर केले. तर अभियांत्रिकीच्या अनिल बोकेफोडेने नटरंग चित्रपटातील 'खेळ मांडिला' गीत सादर करुन आपल्यातील जादू दाखवली. अमित माळवीने सँड आर्टची उत्कृष्ट कला सादर केली. रविवारच्या सुटीमुळे लोककला केंद्रात कार्यक्रम पाहण्यासाठी शौकिनांनी मोठी गर्दी केली होती.

यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा शिववनश्री पुरस्कारने सन्मानित केले. तसेच शिवपुरस्काराने डॉ. ए. डी. जाधव, डॉ. टी. एस. कांबळे, प्रशांत झमले, वैशाली कोकाटे, अजय आयरेकर, सुरेश बंडगर यांना सन्मानित केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, बीसीयूडी डॉ. डी. आर. मोरे, स्पेक्ट्रमचे सुनील पाटील, देवस्थान समितीचे सदस्य विजय पोवार, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, संतोष माने, अक्षय मोरे, नीलेश यादव, अवधूत अपराध, डॉ. प्रवीण कोडोलीकर आदी उपस्थित होते.

**लघुपट महोत्सव**

महोत्सवात सकाळी अॅन अनुप जत्राटकर मल्टिमीडिया प्रोडक्शन्स'च्या सहकार्याने लघुपट महोत्सव पार पडला. केशकर्तन करुन उदर निर्वाह करणाऱ्या स्त्रीवरील 'बलुतं' या लघुपटात स्त्री जीवनाचे प्रतिबिंब दिसले. 'उतारा' लघुपटातून अंधश्रद्धा व जादूटोणा या विषयावर परखड भाष्य केले. 'गो ग्रीन'मधून पर्यावरणाचा संदेश दिला. संग्राम भालकर यांचा 'वारसा' व किरण साष्टे यांच्या 'दादू' लघुपटाने सामाजिक स्थितीवर भाष्य केले.

28 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# लोकसंस्कृतीतून उलगडले 'मराठी'चे अंतरंग

## 'मराठी आमुची मायबोली' कार्यक्रमात दिंडी, लावणी, प्रहसन, पोवाड्याचे सादरीकरण

कोल्हापूर, ता. २७ : महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या लोकसंस्कृतीच्या अप्रतिम सादरीकरणातून मराठी भाषेचा आज गौरव झाला. विठूनामाच्या गजरातील दिंडी, ठसकेबाज लावणी, खड्या आवाजातील पोवाडा ते विनोदी प्रहसनातून मराठी भाषेचे अंतरंग उलगडत गेले आणि मराठी गीतांच्या सुरावटींत श्रोतावर्ग चिंब झाला. निमित्त होते शिवाजी विद्यापीठ व उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'मराठी आमुची मायबोली' कार्यक्रमाचे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. त्यानंतर संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात विठू नामाच्या गजरात दिंडी अवतरली. रुणझुण रुणझुण रे भ्रमरा, वृक्षवल्ली आम्हा सोयरे, खेळ मांडियेला.. अशा गीतांतून वातावरणात चैतन्य पसरले. निरंजन भाकरे यांनी भारुडातून माय मराठीचा अभिमान जागृत केला, तर अभिनेते पुष्कर श्रोत्री यांनी अफजलखान वधाचा बखरीतील प्रसंग सांगितला.

कार्यक्रमाचे दिग्दर्शन सुभाष नकाशे यांनी केले, तर अजित परब व मंदार खराडे यांनी लेखन केले. मंदार खराडे यांनी निवेदन, तर पुष्कर श्रोत्री यांनी कविता व नाट्यवाचन केले. सोनाली कर्णिक, सुचित्रा भागवत, धनंजय म्हसकर, उदेश उमप यांनी गायन केले. आदित्य ओक, प्रशांत लळीत, प्रभा मोसमकर, अनिल करंजगावकर, अभिजित सावंत यांनी संगीत साथ दिली. मीनल भिके यांनी नृत्य दिग्दर्शन केले. सुनील कुलकर्णी यांनी निर्मिती केली. प्रसंगी शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी डॉ. अजित चौगुले, डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते.



कोल्हापूर : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित 'मराठी आमुची मायबोली' कार्यक्रमात विठूनामाच्या गजरात दिंडीचे सादरीकरण करताना कलाकार.

**विद्रोही साहित्याचे प्रतिबिंब...**

उदेश उमप यांनी शिवरायांच्या पराक्रमाची महती अफजलखान वधाच्या पोवाड्यातून सादर केली. शौर्याने भारलेल्या वातावरणात 'सांगा मुकुंद कुणी हा पाहिला,' गीताने भक्तीरसाचा आनंद वृद्धिंगत केला. ठसकेबाज लावणीने श्रोत्यांच्या माना डोलल्या व बहिणाबाई, शांता शेळके यांच्या कवितांनी स्त्री साहित्याचे क्षितिज किती विशाल आहे, याची जाणीव करून दिली. संगीत नाट्यानंतर शूरा मी वंदिले, जयोस्तुते गीते सादर झाली. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांच्या विद्रोही साहित्याचे प्रतिबिंबही स्टेजवर उमटले. 'माझी मैना गावाकडं राह्यली' छक्कड सादर झाल्यानंतर विनोदी प्रहसनातून हास्याचे फवारे उडाले.

28 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# मराठी भाषेला मानाचा मुजरा

**'मराठी आमुचि मायबोली' कार्यक्रमात मराठमोळी संस्कृती एकवटली**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या संस्कृतीतील विविधतेचे दर्शन घडविणाऱ्या कलाविष्काराच्या उधळणीने कलाकारांनी 'मराठी आमुचि मायबोली'चा जागर केला. पोवाडा, भारूड, गोंधळ, लावणी, पोतराज, जोगवा, कोळीनृत्यासह नाट्यपद, मराठी भक्तिगीत-भावगीतांच्या सादरीकरणातून कलाकारांनी रसिक प्रेक्षकांची सोमवारची सायंकाळ रम्य बनविली.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी राजभाषा गौरवदिनाचे औचित्य साधून रुद्र थिएटरनिर्मित 'मराठी आमुचि मायबोली' हा सांस्कृतिक कार्यक्रम केशवराव भोसले नाट्यगृहात झाला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमनार यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. डॉ. खेमनार यांनी मराठीचा प्रत्येकाने अभिमान बाळगावा, असे आवाहन केले.



**कोल्हापूर : केशवराव भोसले नाट्यगृहात आयोजित 'मराठी आमुचि मायबोली' या सांस्कृतिक कार्यक्रमात 'संत नामाचा गजर' नृत्य करताना कलाकार. (छाया : पप्पू अत्तार)**

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, मराठीचा सन्मान हा आईचा सन्मान आहे. मराठीच्या अभिजातपणाबद्दल चर्चा होते. मराठी प्राचीन भाषा आहे. तरुणांनी मातृभाषेचा सन्मान करावा, त्याबद्दल लाज बाळगू नये.

उद्‌घाटनानंतर 'विठू नामाचा गजरा'त निघालेल्या दिंडीने सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. 'रुणझुण-रुणझुण रे भ्रमरा', 'विठाई माझी कृष्णाई' अशी गीते गायक अजित परब यांच्यासह कलाकारांनी सादर करीत वातावरण भक्तिमय केले. निरंजन भाकरे यांनी संत नामदेव यांचे भारूड सादर केले. अभिनेते पुष्कर श्रोती यांनी अफझलखान वधाचे बखरीतील वर्णन केले. लोकशाहीर उदेश उमप यांनी अफझलखान वधाचा पोवाडा सादर करून शिवरायांचा साक्षात इतिहास डोळ्यांसमोर उभा केला.

उदेश उमप यांनी 'सईमाया' या मराठी बोली भाषेतील गीत सादर केले. पुष्कर श्रोती यांनी 'एकच प्याला'मधील तळीराम हे पात्र बहारदार अभिनयातून रंगविले. पोतराज, गोंधळ, जोगवा नृत्याने सांस्कृतिक कार्यक्रमाची रंगत उत्तरोत्तर वाढविली. यावेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, राष्ट्रीय योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड आदी उपस्थित होते. मंदार खराडे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

28 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोककलेतून मराठी भाषेला मानाचा मुजरा

## शिवाजी विद्यापीठातर्फे 'मराठी आमुची मायबोली'चे बहारदार सादरीकरण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारूड, दिंडी, पोवाडा, मंगळागौर, कोळीगीत, रोमांचकारी बखरीचे वाचन, ठसकेबाज लावणी आणि शेतकरीनृत्यासह अजरामर झालेल्या मराठी गीतांचे कलाकरांनी तन, मन लावून सादरीकरण करत उपस्थित मराठी रसिकांची सोमवारी मने जिंकली. निमित्त होतं मराठी आमुची मायबोली या सांस्कृतिक कार्यक्रमाचे. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात कार्यक्रम झाला. ज्येष्ठ शाहीर (कै.) विठ्ठल उमप यांचे पुत्र उदेश उमप यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या अफझलखानाच्या वधावरील पोवाडा म्हणून रसिकांना रोमांचित केले. निरंजन भाकरे यांनी तर करारी आवाजात मातृभाषा ही माझी मराठी भाषा आहे, हे भारूड सादर करून मराठी भाषेला अभिवादन केले.



कोल्हापूर : नृत्याविष्कार करत-करत विठ्ठलाचा नामजप करताना दिंडीतील सहभागी कलाकार. (छाया : रियाज ट्रेनर)

मराठी राजभाषादिनाचे औचित्य साधून राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमनार यांच्या हस्ते श्रेष्ठकवी कुसूमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांनी मनोगत व्यक्त करताना मराठी भाषा ही समाजाला अभिजात ऊर्जा देणारी भाषा आहे, असे सांगितले. ते म्हणाले, मराठी शाळांची संख्या कमी होत असल्याची भिती फार काळ टिकणार नाही. कारण नदीच्या प्रवाहासारखी असलेली मराठी भाषा नदी इतकीच विस्तारीत आणि समृद्ध आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, उपकुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाअधिकारी अजित चौगुले, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उच्च व तंत्रशिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर आदी उपस्थित होते. गायक उदेश उपम, सुचित्रा भागवत, अजित परब, धनंजय मस्कर यांनी रसिकांची भरभरून दाद मिळवली. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

'28 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# आंबेडकरांची पत्रकारिता न्याय प्रस्थापनेमधील महत्त्वाचा टप्पा

## तापसी बसू : शिवाजी विद्यापीठात दोनदिवसीय राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : देशात स्वातंत्र्याची चळवळ जोमात असताना सामाजिक स्वातंत्र्याच्या संघर्षाला धार प्राप्त करून देण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांची पत्रकारिता ही देशाच्या सामाजिक न्याय प्रस्थापनेमधील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा होता, असे प्रतिपादन कोलकाता विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रा. डॉ. तापती बसू यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे सोमवारपासून 'आयसीएसएसआर पुरस्कृत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय दृष्टिकोन आणि त्याचे वर्तमानकालीन प्रयोजन' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात बोलत होत्या. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ. बसू म्हणाल्या, बाबासाहेबांच्या प्रत्येक वृत्तपत्राच्या नावातच त्यांच्या मनाशी असलेले हेतू सामोरे येतात. पहिला 'मूकनायक' हा दलित, शोषित, पीडित जनतेचा



शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात डॉ. तापती बसू यांनी मार्गदर्शन केले.

अर्थात ज्या समाजाला स्वत:चा आवाज नव्हता, अशा समाजाला स्वत:चा आवाज मिळवून देणारा हा मूकनायक होता. 'बहिष्कृत भारत' हा भारतामधील एक षष्टमांश बहिष्कृत जनतेच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा होता. त्यानंतर 'जनता'मधून जनतेमध्ये एकता व एकात्मतेची जाणीव पेरण्याचा प्रयत्न होता, 'प्रबुद्ध भारत'मधून त्यांचे प्रज्ञाशील भारताचे स्वप्न अधोरेखित होते.

काशी बनारस विश्वविद्यालयाचे वृत्तपत्र विद्या विभागाचे माजी प्रमुख डॉ. राम मोहन पाठक म्हणाले, बंगाली व मराठी पत्रकारितेचे हिंदी पत्रकारितेमध्ये सामाजिक प्रेरणा निर्माण करण्यात महत्त्वाचे योगदान आहे. यामध्ये बाबासाहेबांच्या पत्रकारितेचे योगदान मोलाचे आहे. बाबासाहेब भाषिक पत्रकारितेचे महत्त्व जाणून होते.

यावेळी व्यासपीठावर सिमला येथील हिमाचल प्रदेश विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागप्रमुख डॉ. वीरबाला अग्रवाल, आग्रा येथील डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे प्रमुख डॉ. गिरीजा शंकर, पुणे विद्यापीठाचे माजी वृत्तपत्र विद्या विभागप्रमुख डॉ. किरण ठाकूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे माजी वृत्तपत्र विद्या विभाग प्रमुख डॉ. विजय धारूरकर, म्हैसूर विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या विभागाचे प्रमुख डॉ. बी. पी. महेशचंद्र गुरु, औरंगाबाद विद्यापीठाचे डॉ. सुरेश पुरी, खुल्ताबाद येथील चिस्तीया महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख डॉ. गणी पटेल उपस्थित होते. (प्रतिनिधी)

28 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कोलकाता विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रा. डॉ. तापती बसू. व्यासपीठावर डॉ. विजय धारूरकर, वीरबाला अग्रवाल, डॉ. सुरेश पुरी, डॉ. किरण ठाकूर, डॉ. राम मोहन पाठक आदी. (छाया : तय्यब अली)

# डॉ. आंबेडकरांमुळेच सामाजिक स्वातंत्र्य संघर्षाला धार : बसू

## विद्यापीठात दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशात राजकीय स्वातंत्र्याची चळवळ जोमात असताना सामाजिक स्वातंत्र्याच्या संघर्षाला धार प्राप्त करून देण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. भारतीय समाजावर त्यांचे थोर उपकार आहेत, असे प्रतिपादन कोलकाता विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रा. डॉ. तापती बसू यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे आजपासून 'आयसीएसएसआर'पुरस्कृत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय दृष्टिकोन आणि त्याचे वर्तमानकालीन प्रयोजन' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. वनस्पतिशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात आयोजित उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या. डॉ. बसू म्हणाल्या, भारतातील पत्रकारितेचा इतिहास म्हणजे काँग्रेसने चालविलेल्या वृत्तपत्रांचा इतिहास आहे. या काँग्रेसवादी वृत्तपत्रांचा विरोध पत्करून बाबासाहेबांनी सामाजिक स्वातंत्र्याचा संघर्ष अथकपणे चालविला. टिळक हयात असताना 'केसरी' वृत्तपत्राने बाबासाहेबांनी पैसे देण्याची तयारी दाखवूनही 'मूकनायक'ची जाहिरात छापण्यास नकार दिला. दलित वृत्तपत्राच्या जाहिरातीलासुद्धा अस्पृश्यतेची वागणूक देण्याच्या काळात बाबासाहेबांनी ज्या प्रखर ध्येयनिष्ठेने आपली पत्रकारिता चालविली, तिला देशाच्या इतिहासात तोड नाही. बंगाली पत्रकारिता बाबासाहेबांच्या पत्रकारितेची प्रशंसक राहिली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मराठी पत्रकारिता ही हिंदी पत्रकारितेसाठी प्रेरणास्थान असल्याचे सांगून यावेळी डॉ. राम मोहन पाठक म्हणाले, बंगाली पान २ वर

# डॉ. आंबेडकरांमुळेच सामाजिक स्वातंत्र्य संघर्षाला धार : बसू

(पान १ वरून) व मराठी पत्रकारितेचे हिंदी पत्रकारितेमध्ये सामाजिक प्रेरणा निर्माण करण्यात महत्त्वाचे योगदान आहे. यामध्ये बाबासाहेबांच्या पत्रकारितेचे योगदान मोलाचे आहे. बाबासाहेब भाषिक पत्रकारितेचे महत्त्व जाणून होते. समाजातल्या अशिक्षित, दलित, शोषित जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक मराठी पत्रकारिता केली. त्यांच्या या पत्रकारितेनेच देशातील दलित पत्रकारितेला कृती कार्यक्रम देण्याचे काम केले. यावेळी काशी बनारस विश्वविद्यालयाचे माजी वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. राम मोहन पाठक, सिमला येथील हिमाचल प्रदेश विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. वीरबाला अग्रवाल, आग्रा येथील डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाचे प्रमुख डॉ. गिरीजा शंकर, पुणे विद्यापीठाचे माजी वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. किरण ठाकूर, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे माजी वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. विजय धारूरकर, म्हैसूर विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख डॉ. बी. पी. महेशचंद्र गुरू, औरंगाबाद विद्यापीठाचे डॉ. सुरेश पुरी, खुल्ताबाद येथील चिस्तिया महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख डॉ. गणी पटेल, डॉ. ओंकार काकडे, ज्येष्ठ संपादक दशरथ पारेकर, डॉ. वासंती रासम, डॉ. ज. रा. दाभोळे आदी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक वृत्तपत्राच्या नावातच त्यांच्या मनाशी असलेले हेतू सामोरे येतात. देशाच्या सामाजिक न्यायाची होत जाणारी त्यांना अभिप्रेत असणारी प्रगती लक्षात येते. 'मूकनायक' हा दलित, शोषित, पीडित अशा समाजाला स्वत:चा आवाज मिळवून देणारा हा होता. 'बहिष्कृत भारत' हा देशातील एक षष्ठमांश बहिष्कृत जनतेच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा होता. 'जनता'मधून भारतीय जनतेमध्ये एकता व एकात्मतेची जाणीव पेरण्याचा प्रयत्न केला. 'प्रबुद्ध भारत'मधून त्यांचे प्रज्ञाशील भारताचे स्वप्न अधोरेखित होते. डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता ही अशा प्रकारे देशाच्या सामाजिक न्याय प्रस्थापनेमधील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा आहे, असेही डॉ. बसू म्हणाल्या.

28 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाबासाहेबांमुळेच सामाजिक स्वातंत्र्याच्या संघर्षाला धार

## डॉ. तापती बसू यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
देशात राजकीय स्वातंत्र्याची चळवळ जोमात असताना सामाजिक स्वातंत्र्याच्या संघर्षाला धार प्राप्त करून देण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. भारतीय समाजावर त्यांचे हे थोर उपकार आहेत, असे प्रतिपादन कोलकाता विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रा. तापती बसू यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे सोमवारपासून आयसीएसएसआर पुरस्कृत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय दृष्टिकोन आणि त्याचे वर्तमानकालीन प्रयोजन' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या निलांबरी सभागृहात झालेल्या या उद्‌घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. बसू बोलत होत्या.

महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख डॉ. गणी पटेल उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेची वैशिष्ट्ये सांगताना डॉ. बसू म्हणाल्या, बाबासाहेबांच्या प्रत्येक वृत्तपत्राच्या नावातच त्यांच्या मनाशी असलेले हेतू सामोरे येतात आणि त्याचबरोबर देशाच्या सामाजिक न्यायाची होत जाणारी किंवा बाबासाहेबांना अभिप्रेत असणारी प्रगतीही नजरेत येते. पहिला 'मूकनायक' हा दलित, शोषित, पीडित जनतेचा अर्थात ज्या समाजाला स्वतःचा आवाज नव्हता, अशा समाजाला स्वतःचा आवाज मिळवून देणारा हा मूकनायक होता. 'बहिष्कृत भारत' हा भारतामधील एक षष्टमांश बहिष्कृत जनतेच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा होता. त्यानंतर 'जनता'मधून भारतीय जनतेमध्ये एकता व एकात्मतेची जाणीव पेरण्याचा प्रयत्न होता, तर अखेरच्या 'प्रबुद्ध भारत'मधून त्यांचे प्रज्ञाशील भारताचे स्वप्न अधोरेखित होते. डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता ही अशा प्रकारे देशाच्या सामाजिक न्याय प्रस्थापनेमधील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा आहे.



**कोल्हापूर : वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे आयसीएसएसआर पुरस्कृत राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रा. तापती बसू, निशा मुढे-पवार व इतर मान्यवर.** (छाया : एस. अली)

बंगाली पत्रकारिता बाबासाहेबांच्या पत्रकारितेची सदैव प्रशंसक राहिली असल्याचेही त्यांनी याप्रसंगी नमूद केले.

मराठी पत्रकारिता ही हिंदी पत्रकारितेसाठी प्रेरणास्थान असल्याचे सांगून यावेळी डॉ. राम मोहन पाठक म्हणाले, बंगाली व मराठी पत्रकारितेचे हिंदी पत्रकारितेमध्ये सामाजिक प्रेरणा निर्माण करण्यात महत्त्वाचे योगदान आहे. यामध्ये बाबासाहेबांच्या पत्रकारितेचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या या पत्रकारितेनेच देशातील दलित पत्रकारितेला कृती कार्यक्रम देण्याचे काम केले.

मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी घालून परिषदेचे उद्‌घाटन करण्यात आले. उद्‌घाटनानंतर झालेल्या चर्चासत्रात डॉ. राम मोहन पाठक, डॉ. वीरबाला अग्रवाल, डॉ. किरण ठाकूर आणि डॉ. विजय धारूरकर यांनी सहभाग घेतला. यावेळी व्यासपीठावर काशी बनारस विश्वविद्यालयाचे माजी वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. राम मोहन पाठक, शिमला येथील हिमाचल प्रदेश विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. वीरबाला अग्रवाल, आग्रा येथील डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख डॉ. गिरीजा शंकर, पुणे विद्यापीठाचे माजी वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. किरण ठाकूर, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे माजी वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. विजय धारूरकर, म्हैसूर विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख डॉ. बी. पी. महेशचंद्र गुरू, औरंगाबाद विद्यापीठाचे डॉ. सुरेश पुरी, खुल्ताबाद येथील चिस्तीया उपस्थित होते. यावेळी डॉ. ओंकार काकडे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, डॉ. वासंती रासम, डॉ. ज. रा. दाभोळे आदी मान्यवर उपस्थित होते.

सकाळ

# आंबेडकरांकडून सामाजिक स्वातंत्र्याच्या संघर्षाला धार

## डॉ. तापती बसू : वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय परिषद सुरू

कोल्हापूर, ता. २७ : 'देशात राजकीय स्वातंत्र्याची चळवळ जोमात असताना सामाजिक स्वातंत्र्याच्या संघर्षाला धार प्राप्त करून देण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. भारतीय समाजावर त्यांचे हे थोर उपकार आहेत,' असे मत कोलकता विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या प्रा. डॉ. तापती बसू यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे आयसीएसएसआर पुरस्कृत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय दृष्टिकोन आणि त्यांचे वर्तमानकालीन प्रयोजन' या विषयावरील दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ झाला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या नीलांबरी सभागृहात परिषदेचे आयोजन केले आहे.

डॉ. बसू म्हणाल्या, ''बाबासाहेबांच्या प्रत्येक वृत्तपत्राच्या नावातच त्यांच्या मनाशी असलेले हेतू सामोरे येतात आणि त्याचबरोबर देशाच्या सामाजिक न्यायाची होत जाणारी किंवा बाबासाहेबांना अभिप्रेत असणारी प्रगतीही दृष्टोत्पत्तीस येते. दलित, शोषित, पीडित जनतेचा अर्थात ज्या समाजाला स्वतःचा आवाज नव्हता, अशा समाजाला स्वतःचा आवाज मिळवून देणारा



शिवाजी विद्यापीठ : राष्ट्रीय परिषदेत बोलताना डॉ. तापती बसू.

हा 'मूकनायक' होता. 'बहिष्कृत भारत' हा भारतामधील एक षष्टमांश बहिष्कृत जनतेच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारा होता. त्यानंतर 'जनता'मधून भारतीय जनतेमध्ये एकता व एकात्मतेची जाणीव पेरण्याचा प्रयत्न होता, तर अखेरच्या 'प्रबुद्ध भारत'मुळे त्यांचे प्रज्ञाशील भारताचे स्वप्न अधोरेखित होते. डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता ही अशाप्रकारे देशाच्या सामाजिक न्याय प्रस्थापनेमधील सर्वाधिक महत्त्वाचा टप्पा आहे.''

त्या म्हणाल्या, ''भारतातील पत्रकारितेचा इतिहास म्हणजे काँग्रेसने चालविलेल्या वृत्तपत्रांचा इतिहास आहे. या काँग्रेसवादी वृत्तपत्रांचा विरोध पत्करून बाबासाहेबांनी सामाजिक स्वातंत्र्याचा संघर्ष अथकपणे चालविला. टिळक हयात असताना 'केसरी' या वृत्तपत्रात बाबासाहेबांनी पैसे देण्याची तयारी दाखवूनही त्यांची जाहिरात छापण्यास नकार दिला. दलित वृत्तपत्राच्या जाहिरातीलासुद्धा अस्पृश्यतेची वागणूक देण्याच्या काळात बाबासाहेबांनी ज्या प्रखर ध्येयनिष्ठेने पत्रकारिता चालविली. बंगाली पत्रकारिता बाबासाहेबांच्या पत्रकारितेची सदैव प्रशंसक राहिली.''

उद्घाटनानंतर झालेल्या चर्चासत्रात डॉ. राम मोहन पाठक, हिमाचल प्रदेश विद्यापीठातील डॉ. वीरबाला अग्रवाल, पुणे विद्यापीठातील डॉ. किरण ठाकूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील डॉ. विजय धारुरकर यांनी सहभाग घेतला. या वेळी डॉ. गिरिजा शंकर, डॉ. बी. पी. महेशचंद्र गुरू, डॉ. सुरेश पुरी, डॉ. गणी पटेल, डॉ. ओंकार काकडे, डॉ. निशा पवार, पत्रकार दशरथ पारेकर, डॉ. वासंती रासम, डॉ. ज. रा. दाभोळे उपस्थित होते.

**'बंगाली व मराठी पत्रकारितेचे हिंदी पत्रकारितेमध्ये सामाजिक प्रेरणा निर्माण करण्यात महत्त्वाचे योगदान आहे. यामध्ये बाबासाहेबांच्या पत्रकारितेचे योगदान मोलाचे आहे. बाबासाहेब भाषिक पत्रकारितेचे महत्त्व जाणून होते.'**
**-डॉ. राम मोहन पाठक,**
बनारस विद्यापीठ

28 FEB 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ




कोल्हापूर : सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठ आयोजित डीवायपी ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी' कार्यक्रमाला सोमवारी दिमाखदार प्रारंभ झाला. अभिनेते राहुल बोस यांच्याशी दिलखुलास संवाद साधताना नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात. (बातमी पान ५ वर »)

(बी.डी.चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)